# प्रेस नोट

## आधार नोंदणी/आधार अद्यावतीकरण करिता ऑनलाईन अपॉइंटमेंट बाबत.

***

सर्व नागरिकांना कळविण्यात येत आहे कि, कोविड-१९चा प्रादुर्भाव कमी करणेसाठी केंद्रशासन आणि राज्य शासनाने जी नियमावली सर्वांना लागू केली आहे ती लक्षात घेता सामाजिक अंतर ठेवणे हे अनिर्वाय आहे . तसेच आधार केंद्रामध्ये होणाऱ्या नागरिकांची गर्दी लक्षात घेता UIDAI प्राधिकरणाने ऑनलाईन अपॉइंटमेंट सिस्टिम चालू करण्यात आली आहे. जेथे प्रत्येक नागरिक खाली नमूद केलेल्या लिंकवर जाऊन आधार नोंदणी करणे व अद्ययावत करण्याकरिता ऑनलाईन अपॉइंटमेंट घेऊ शकता ज्याने सध्याची परिस्थिती लक्षात घेता सामाजिक अंतर देखील राखले जाईल आणि नागरिकांची गैरसोय देखील होणार नाही.

सदर ऑनलाईन अपॉइंटमेंट सेवा हि विनामूल्य असून त्याकरिता आपल्यास कुठल्या ही प्रकारचा शुल्क द्यावा लागणार नाही. परंतु UIDAI प्राधिकरणा मार्फत आधार अद्ययावत करण्यासाठी जे शुल्क ठरविण्यात आले आहेत व दरपत्रकामध्ये नमूद आहे तो शुल्क मात्र आपल्याकडून आकारला जाईल.

ऑनलाईन अपॉइंटमेंट घेण्याकरिता आपण कोणत्याही सायबर कॅफेद्वारे आधार नोंदणी करिता ऑनलाईन अपॉइंटमेंट घेत असताना जर ते आपल्याकडून कोणत्याही प्रकारचा शुल्क आकारत असतील तर त्यास जिल्हा प्रशासन व एनरोलमेंट एजेन्सी जबाबदार राहणार नाहीत. तसेच आधार केंद्रचालक जरी आपल्याकडून सदर कामासाठी पैशाची मागणी करत असतील तर त्वरित हि बाब आपल्या संबंधित जिल्हा प्रशासन यांच्या निदर्शनास आणून द्यावीत. ऑनलाईन अपॉइंटमेंट घेण्याकरिता खालील दिलेल्या संकेतस्थळावर भेट द्या.

https://ask.uidai.gov.in

किंवा play-store वर जाऊन mAadhar - App डाउनलोड करून मोबाईलद्वारे ऑनलाईन अपॉइंटमेंट घेऊ शकता.

जिल्हाधिकारी, अमरावती करिता